• वर्ष ७ • अंक १६ •१५ जुलै २०१२ • पाने २०

स्वाभिमानी विचार

संपादक : खासदार राजू शेट्टी

• कार्यकारी संपादक •
डॉ. महावीर अक्कोळे

• सह संपादक •
डॉ. श्रीवर्धन पाटील, जगदीश इनामदार

• निवासी संपादक : सदाभाऊ खोत

•मानद सल्लागार : मा. श्री. अण्णा हजारे राळेगणसिद्धी, न्या. पी. बी. सावंत पुणे, न्या.बी.जी.कोळसे पाटील पुणे, . प्रा. शरद पाटील सांगली, कुमार सप्तर्षी पुणे, माजी आमदार. वामनराव चटप चंद्रपूर • व्यवस्थापक : सुभाष शेट्टी • कार्यालय : भरत पतसंस्थेच्या माडीवर, पोलीस स्टेशनसमोर, जयसिंगपूर, ता. शिरोळ. फोन : (०२३२२) २२४३२७

SWABHIMANI VICHAR (Fortnightly) स्वाभिमानी प्रतिष्ठान संचलित पाक्षिक स्वाभिमानी विचार हे पत्र संपादक *खासदार राजू उर्फ देवाप्पा अण्णा शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, पोलिस स्टेशनजवळ, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. प्रकाशन स्थळ : स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र राज्य). दूरध्वनी : (०२३२२) २२४३२७. मुद्रण स्थळ : सुनील प्रिंटर्स, जयसिंगपूर. फोन (०२३२२) २२४३२७ पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी * यांची आहे. पाक्षिक स्वाभिमानी विचारमधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवण्यात आलेले आहेत. Decleration No. Desk No. VII Home N.P.S.R./58/2005 RNI No. MAH/MAR/2005/16213 या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

Email : rajushetti@gmail.com

वार्षिक वर्गणी रु. १००/-

## संपादकीय

डॉ. महावीर अक्कोळे
mahaveerakkole@gmail.com

# मिशन लोकसभा २०१४

दोन वर्षानंतर होऊ घालणाऱ्या लोकसभेची चर्चा आतापासूनच सुरू आहे. खासदार राजू शेट्टींनी राष्ट्रवादीच्या श्रीमती निवेदिता मानेंचा पराभव करून ९५०६० मतांनी दणदणीत विजय मिळविला होता. खा. शेट्टींनी नोव्हेंबर ११ मध्ये बारामतीमध्ये आमरण उपोषण करून राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला होता. हे आंदोलन कृषिमंत्री शरद पवार यांच्या फारच जिव्हारी लागले होते. यामुळे काही केले तरी राजू शेट्टींच्या विरोधात वजनदार माणूस उभा करायची ही तयारी काका पुतण्यांनी चालवली आहे.

पैसा आणि सत्तेच्या जोरावर त्यांनी अनेक ठिकाणी राष्ट्रवादीने सत्ता हस्तगत केली आहे. गेल्या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या उमेदवाराचा झालेला पराभव फारच जिव्हारी लागलेला आहे. हातकणंगले मध्ये खा. शेट्टींना कसे शह द्यायचे अशी व्यूहरचना आखली जात आहे. तसेच काही साखर सम्राट देखील खा. शेट्टींचा पाडाव करण्यासाठी एकत्र येत आहेत. जेणेकरून शेतकऱ्यांचे आंदोलन मोडीत काढून साखर कारखान्यात जो आपण दर देईल तोच फायनल दर ठरविण्याचे षडयंत्र काही लबाड नेत्यांनी चालविले आहे. असो शेतकरी शहाणाआहे. त्याला खरे खोटे आता कळत आहे. नको त्या माणसाची चर्चा न केलेलीच बरी. खा. शेट्टींनी मिशन लोकसभा आतापासूनच सुरु केले आहे. राज्यातून एकून १६ लोकसभा मतदारसंघ निवडले आहेत. कोल्हापूर

सांगली,सातारा,पुणे, सोलापूर,अहमदनगर,नाशिक,औरंगाबाद,लातूर,जालना,परभणी, नांदेड,उस्मानाबाद,बुलढाणा,वाशिम,यवतमाळ हे १६ मतदारसंघ निवडले आहेत. या मतदारसंघात स्वाभिमानी शेतकरी संघटनेने १० जणांची टीम तयार केली आहे. स्वाभिमानीचे मुलुख मैदान तोफ सदाभाऊ खोत यांच्या मार्गदर्शनाखाली ही टीम संपूर्ण राज्यभराच्या दौऱ्यास सुरूवात केली आहे. यामध्ये सदाभाऊ खोत, दशरथ सावंत, गजानान अहमदाबादकर, राजेंद्र गड्ड्यान्नावर, प्रा. जयंत बगाडे, संजय वाघ, संजय पाटील, रविकांत तुपकर, सत्तार पटेल, प्रा. डॉ. जालंधर पाटील यांची निवड करण्यात आली. ३० जून ते २० जुलैपर्यंत हा दौरा असणार आहे. तसेच गावागातील कार्यकारणी नव्याने अथवा फेरनिवड करण्याचे खा. शेट्टी यांनी आधीच सांगितले आहे. त्यानुसार अनेक गावातही कार्यकारणी करण्यात आलेली आहे. यानंतर सभेचे दौरे आखले जाणार आहेत.

# स्वाभिमानी पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी उत्तमराव जानकर, तर सचिवपदी राजेंद्र गड्ड्यान्नावर

जयसिंगपूर (प्रतिनिधी): स्वाभिमानी पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी माळशिरस पंचायत समितीचे उपसभापती उत्तमराव जानकर, तर गडहिंग्लज येथील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे आक्रमक संघटक राजेंद्र गड्ड्यान्नावर सचिवपदी यांची निवड झाली आहे. तसेच संजय वाघ व संजय पाटील यांचीही सचिवपदी निवड करण्यात आली असल्याची घोषणा स्वाभिमानी पक्षाचे अध्यक्ष खासदार राजू शेट्टी यांनी केली.

स्वाभिमानी पक्षाच्या बांधणीच्या दृष्टीने खासदार राजू शेट्टींनी नुकतीच पंढरपूर येथे राज्य कार्यकारणीची बैठक घेतली. या बैठकीतच ही निवड जाहीर करण्यात आली आहे. महासचिवपदी डॉ. महावीर अक्कोळे यांची निवड केली आहे. क्रियाशील कार्यकर्त्यांना पद देणार असे खा. शेट्टी यांनी सांगितले होते. त्यानुसार ही फेररचना करण्यात आलेली आहे. त्यानुसार स्वाभिमानी पक्षाची राज्य कार्यकारणी पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आली आहे.


**श्री भरत अर्बन को-ऑफ बँक लि., जयसिंगपूर**

ता. शिरोळ, जि. कोल्हापूर फोन : २२५४३०, २२५७२२ २२९९२३ फॅक्स नं. : ०२३२२ २२५७२३

■ २८ हजारांवर सभासद ■ संस्थापक, संचालक व्यवस्थापन ■ सर्व शाखा कार्यालये स्वत:चे इमारतीत ■ अद्ययावत कॉम्प्युटर सेवा ■ सर्व शाखांकडे लॉकर्सची सोय ■ देशातील प्रमुख ४८८ शहरांतील डी.डी.ची अल्प कमिशनमध्ये सोय ■ बँक सतत नफ्यात ■ ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवर १/२ टक्के जादा व्याज

| ठेवी | कर्जे | ऑडिट वर्ग | बँक सतत | स्वभांडवल | गुंतवणूक | एन.पी.ए. |
|---|---|---|---|---|---|---|
| ४१७७.१९ | २१९८.७१ | ---- | नफ्यात | ५५५.१५ | २१८९.५२ | [illegible] |

श्री. व्ही. बी. हुले. बी. ए. बी. कॉम. चिफ एक्झि. ऑफिसर
श्री. अशोक शां रूणवाळ. बी. कॉम व्हा. चेअरमन व सर्व संचालक
पै. विठ्ठल बाबुराव मोरे एम. ए. चेअरमन

**TEXMO INDUSTRIES** Taro




• अधिकृत विक्रेते •

**बाहुबली** इलेक्ट्रिकल्स | **गोमटेश** इलेक्ट्रिकल्स

प्रोप्रा. अरुण किर्तीकुमार माणगावे

**M/S. MANGAVE BOREWELLS**

BOREWELL CONTRACTOR

Opp. Mangave Petrol Pump. Jaysingpur. Dist : Kolhapur (M.S.)

Ph. (02322) 229866. Mo. 9822551008/9422428266



**Shree Datta Prestrestess**

M.f. PCC Pole

Shirol Road, Jaysingpur.

# आजरा तालुका ‘स्वाभिमानी’च्या अध्यक्षपदी तानाजी देसाई



आजरा : आजरा तालुका स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या अध्यक्षपदी तानाजी श्रीपती देसाई व उपाध्यक्षपदी नरेंद्र गोपाळ कुलकर्णी यांची निवड झाली. संघटनेचे राज्य प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत यांनी गडहिंग्लज येथे आजरा तालुक्याची स्वाभिमानी शेतकरी संघटना, स्वाभिमानी पक्ष व स्वाभिमानी युवा आघाडीची नवी कार्यकारणी जाहीर केली. या वेळी पक्षाचे राज्य सचिव राजेंद्र गड्ड्यान्नावर, जिल्हाध्यक्ष भगवानराव काटे प्रमुख उपस्थित होते. विनायकराव देसाई-शहरप्रमुख व जिल्हा कार्यकारिणी सदस्य, जिल्हा कार्यकारिणी सदस्यपदी नंदकुमार अमृतराव सरदेसाई यांची निवड झाली.

कार्यकारिणी : तानाजी देसाई-अध्यक्ष (पेरणोली), नरेंद्र कुलकर्णी-उपाध्यक्ष (गजरगाव), कृष्णा पाटील-सरचिटणीस (साळगाव), शिवाजी बुगडे (कोलिंद्रे), अप्पासाहेब सरदेसाई (निंगुडगे), विष्णुपंत देसाई (झुलपेवाडी), आनंदराव पाटील (कोरीवडे), सर्व संघटक, विष्णू होडगे (मसोली), बाबूराव आडाव (देवर्डे), रामेश्वर पाटील (मेढेवाडी), धोंडिबा सावंत (खेडगे), गोपाळ पाटील (सरोळी), निवृत्ती पाटील (मडिलगे), शिवाजीराव देसाई (पेरणोली), एकनाथ देसाई (सोहाळे), तुळसाप्पा पोवार (देऊळवाडी), ईश्वर जाधव (पेरणोली), जोतिबा कुरणे (गजरगाव), रवींद्र परीट (विटे), नारायण पाटील (लाटगाव), राजाराम पाटील (एरंडोळ) व दशरथ मांगले (लाटगाव). स्वाभिमानी पक्ष कार्यकारिणी अशी : सखाराम केसरकर- अध्यक्ष (किणे), भिकाजी पाडेकर- उपाध्यक्ष (झुलपेवाडी), मधुकर सरदेसाई (निंगुडगे), एकनाथ कुडवे (बेलेवाडी), जयवंत प्रभू (वेळवट्टी), लिंगनाथ पाटील (कोरिवडे), तुकाराम कांबळे (किणे), शिवाजी गुरव (सुलगाव), प्रकाश देसाई (पेरणोली), मधुकर गुरव (साळगाव), तानाजी सरदेसाई (लाटगाव) व आनंदराव पाटील (उत्तूर). स्वाभिमानी युवा आघाडी कार्यकारिणी अशी : सुरेश पाटील- अध्यक्ष (कोरीवडे), बयाजी मिसाळ- उपाध्यक्ष (आवंडी), अनिल पाटील (साळगाव), इंद्रजित देसाई (वेळवट्टी), नितीन कुंभार (सुलगाव), संजय सुतार (झुलपेवाडी), अशोक सासुलकर (पेरणोली), किरण सरदेसाई (लाटगाव), गणपती कसलकर (देवकांडगाव), पांडुरंग पाटील (कोरिवडे), प्रकाश जाधव (किणे) सदस्य आहेत.

# स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे साखर कारखान्यांवर मोटारसायकल मोर्चा

बेडकिहाळ : चिक्कोडी तालुका शेतकरी संघटनेच्या वतीने नुकतीच तालुक्यातील साखर कारखान्यांवर भव्य मोटारसायकल रॅली काढून २०१०-११ मधील गाळप केलेल्या उसाचे अंतिम बिल तसेच ११-१२ मध्ये गाळप केलेल्या उसाचा दुसरा हप्ता देण्याची मागणी करण्यात आली.

अंतिम बिल न देताच तालुक्यातील कारखानदारांनी येणाऱ्या गळीत हंगामाचे नियोजन चालवले होते. पण महाराष्ट्रातील साखर कारखान्यांनी २०१०-११ चे अंतिम बिल घोषित करून २०११-१२ चा दुसरा हप्ता शेतकऱ्यांना दिला. मात्र तालुक्यातील साखर कारखानदारांनी याबाबत कसलाच विचार केला नाही. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

बेडकिहाळ सर्कल येथून या रॅलीस प्रारंभ होऊन व्यंकटेश्वरा साखर कारखाना, दूधगंगा साखर कारखाना, हालसिद्धनाथ साखर कारखान्यांना (निपाणी) निवेदन देण्यात आले. याप्रसंगी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख मार्गदर्शक यांच्यासह चिक्कोडी तालुक्यातील गावागावातील शेतकरी संघटनेचे अध्यक्ष, पदाधिकारी उपस्थित होते. रॅलीस तालुक्यातील शेतकऱ्यांनी प्रचंड संख्येने उपस्थित होते.

# जलशुद्धीकरण केंद्रास खासदार शेट्टी यांची भेट

नवेखेड : येथील जलशुद्धीकरण केंद्रास खासदार राजू शेट्टी यांनी भेट दिली. तेथील शुद्धतेच्या कामाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. काही गावात दूषित पाण्याने साथ सुरू आहे. त्या पार्श्वभूमीवर त्यांनी ही भेट दिली. नवेखेड, जुनेखेड गावाला या शुद्धीकरण केंद्रातून पाणीपुरवठा होतो. टाकीभोवतीचा परिसर, स्वच्छता, पाणी शुद्ध करण्यासाठी टाकण्यात येणाऱ्या क्लोरीन व मीठाचे प्रमाण या बाबींची त्यांनी माहिती घेतली. मीटर पद्धतीने पाणी वाटपाचा निर्णय स्तुत्य असल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यात पाणी योजनेचे रायझिंग मेन बदलून नवीन रायझिंग मेन टाकण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. त्याबरोबर गावात समान दाबाने पाणी जाईल, यासाठी पदाधिकाऱ्यांना प्रयत्नशील राहावे, असे त्यांनी सांगितले. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे भागवत जाधव, उपसरपंच विठ्ठल गुंजवटे, हुतात्मा कारखान्याचे संचालक जनार्दन जाधव, माजी संचालक विलास जाधव, सोसायटीचे अध्यक्ष जयकर चव्हाण, हौसेराव थोरात उपस्थित होते.



नवेखेड : येथील जलशुद्धीकरण केंद्रास खासदार राजू शेट्टी यांनी भेट देऊन पाहणी केली.

# शेतकरी संघटनेच्या दणक्याने कारखाने सरळ

## थकीत बिले अदा व्याज कोटीत; राजकीय दबाव ठरला फोल

सांगली : सहकार विभागावर राजकीय दबावाचा वापर करून जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना चेपवू पाहणाऱ्या साखर कारखानदारांना स्वाभिमानी शेतकरी संघटनेने पुन्हा दणका दिला आहे. उसाची थकीत बिले वसूल करण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने या प्रकरणी कारखाना संचालकांवर फौजदारी दाखल करण्याची म ागणी केली. त्यामुळे पंधरा दिवसांत उसाची नव्वद कोटींची थकबाकी आठ-दहा कोटींवर आली आहे.

उसाचे गाळप झाल्यानंतर चौदा दिवसांत पहिली उचल अदा करावी, असा नियम आहे. सहकार सहसंचालक (साखर) यांनी मेच्या १६ तारखेला नोटीस काढून कारखान्यांना थकीत बिले देण्याची सूचना केली होती. वसंतदादा, माणगंगा, तासगाव, केन ॲग्रो आणि महांकाली या कारखान्यांकडे ८९ कोटी थकीत होते. काहींनी एक मार्चनंतरची, काहींनी १५ फेब्रुवारीनंतरची तर एकाने डिसेंबरपासूनची बिले थकवली होती. साखरदरातील चढ-उतार, राज्य बँकेची कडक भूमिका, जिल्हा बँकेत प्रशासक नियुक्ती यामुळे सुरू असलेला कायदेशीर कारभार आदींम ुळे कारखान्यांची कोंडी होती, ही वस्तुस्थिती आहे. परंतु, ते कारण पुढे करून बिले लांबवण्याचा प्रयत्न सुरू होता. शेतकरी संघटनेने हात घातला आणि कायद्यावर बोट ठेवले. सहकार सहसंचालक (साखर) यांना कारवाईचा बडगा उगारावाच लागला.

कारखान्यांना मार्च अखेर पहिली कारणे दाखवा नोटीस बजावली होती. बहुतेकांनी उत्तर टाळले, राजकीय दबाव आणून पुढील कारवाई होणार नाही, याची खबरदारी घेतली, असा आरोप आहे. कारखान्यांचे मूल्यांकन करून व गरज भासल्यास मालमत्ता विकून ऊस बिले अदा करण्यासाठी नोटीस बजावली. कारखानदार हादरले. संघटनेने जिल्हा बँकेचे प्रशासक शैलेश कोतमिरे यांच्याशीही चर्चा केली. त्यांनी कारखानदारांशी संपर्क साधला. बिल जमा करण्याच्या प्रक्रियेस गती आली. पंधरा-वीस दिवसांत ८० कोटी रुपयांची बिले अदा झाल्याची माहिती हाती आली. उर्वरित दहा कोटी रुपये ३० जूनपर्यंत भरले जातील, अशी ग्वाही मिळाली आहे. काही कारखान्यांनी सर्व रक्कम अदा केली आहे.

### संचालकांची मालमत्ता विका

थकीत ऊस बिलासाठी कारखान्याची मालम त्ता विकणे म्हणजे सभासदांची मालमत्ता विकणे असा अर्थ होतो. त्यामुळे संचालकांची मालमत्ता जप्त करून ती विका आणि बिल अदा करा, अशी भूमिका स्वाभिमानी शेतकरी संघटनेने घेतली. त्याचवेळी संचालकांवर फौजदारीचीही मागणी युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष संदीप राजोबा यांनी केली आहे. दोन्ही संघटना या लढ्यात उतरल्याने श्रेयवादाचा मुद्दा असला तरी ऊस उत्पादकांना थकीत रक्कम मिळाली, हे महत्त्वाचे आहे.

### व्याजासह वसुली होणार का?

ऊस गाळपानंतर १४ दिवसांत बिल अदा करण्याचा कायदा आहे. परंतु, कारखाने बिल जमा करायला कधी दोन तर कधी तीन-तीन महिने अवधी घेतात. विलंबाबद्दल कोणताही दंड होत नसल्यामुळे बिले लांबवली जातात, असा आरोप होतोय. त्यामुळे विलंब झाल्यास व्याजासह बिल द्यावे, अशी मागणी शेतकरी संघटनेने केली आहे.



# मंत्रालयातील आगीबाबत संशयकल्लोळ

## खासदार शेट्टी : आग लागली तेव्हा सहाशे पोलिस काय करीत होते?





कोल्हापूर : 'राज्याची अस्मिता असलेल्या मंत्रालयाला आग लागल्यानंतर नागरिक घाबरून पळून गेल्याचे आपण समजू शकतो; पण तेथे बंदोबस्तासाठी सहाशे पोलिस होते. त्यांना इमारत भस्मसात होईपर्यंत कसे कळले नाही? कर्मचारीही पळून गेले, चालक वाहने सोडून बाहेर निघून गेले या सर्व गोष्टींचा विचार करता मंत्रालयाला लागलेल्या आगीबाबत संशयकल्लोळच आहे, असे खासदार राजू शेट्टी यांनी आज 'सकाळ'च्या राज्यभरातील संपादक व संपादकीय विभागातील सहकाऱ्यांशी बोलताना सांगितले. जी कार्यालये भस्मसात झाली त्या कार्यालयाशी संबंधित नागरिकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांच्या फायली, चौकशींच्या तक्रारींचा समावेश होता. त्यावरून या घटनेला अपघात म्हणता येईल काय? हाही प्रश्नच असल्याचे श्री. शेट्टी म्हणाले.

उद्यमनगर येथील 'सकाळ'च्या नूतन कार्यालयाला श्री. शेट्टी यांनी भेट दिली. निवासी संपादक मनोज साळुंखे, मुख्य प्रतिनिधी सुधाकर काशीद यांनी त्यांचे स्वागत केले. त्यानंतर श्री. शेट्टी यांनी राज्यभरातील 'सकाळ'चे संपादक आणि संपादकीय विभागातील सहकाऱ्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संपर्क साधला. या वेळी विचारलेल्या अनेक प्रश्नांना श्री. शेट्टी यांनी मनमोकळी उत्तरे दिली.

शेतकऱ्यांच्या मालाला उत्पादन खर्चापेक्षा जास्त दर मिळालाच पाहिजे. त्यासाठीचे आंदोलन यापुढे अधिक तीव्र करण्याचा इशारा त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात दिला. पाण्याचा प्राधान्यक्रम बदलण्याच्या निर्णयावरही त्यांनी सडकून टीका केली. पहिल्यांदा शेतीलाच पाणी दिले पाहिजे; पण शासनाचे याकडे सोयीस्कर दुर्लक्ष झाले आहे. उजनीच्या पाण्याची गळती का होते? ८० हजार कोटी रुपये दहा वर्षांत खर्च करूनही सिंचन प्रकल्प अपुरेच आहेत. शेतीला पुरेसे पाणी मिळत नाही हे प्रश्न अजून का सुटलेले नाहीत याची चौकशीच व्हायलाच पाहिजे, असेही ते या वेळी म्हणाले.

कापूस, कांदा, ज्वारी यासारख्या पिकांना त्याच्या उत्पादन खर्चाएवढाही भाव मिळत नसल्याने शेतकरी ऊस पिकांकडे आकर्षित झाल्याचे श्री. शेट्टी यांनी या वेळी सांगितले. खतांच्या किमती दुपटीने, तिपटीने वाढल्या; पण त्या प्रमाणात उत्पादन खर्चात वाढ झाली नसल्याचे त्यांनी सांगितले. गरिबांना स्वस्तात

पान ७ वर ▶



# मंत्रालयातील आगीबाबत संशयकल्लोळ : खा. शेट्टी

▶ पान ६ वरुन

धान्य देण्याच्या केंद्राच्या योजनेला आपला तीव्र विरोध असल्याचे सांगून ते म्हणाले, ''सार्वजनिक वितरण व्यवस्था भ्रष्टाचाराने बरबटलेली आहे. खुल्या बाजारातून जरी सरकार या योजनेसाठी धान्य खरेदी करणार असले तरी हेच धान्य काळ्या बाजाराने पुन्हा बाजारात येईल. मग ते स्वस्तात विकले जाईल, अशा परिस्थितीत शेतकऱ्यांचे जादा दराचे धान्य कोण खरेदी करेल, म्हणून या योजनेला आपला विरोध आहे.'' या वेळी त्यांच्यासोबत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष भगवान काटे होते.

## तर मत कलामांनाच असते....

राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत आपले मत कोणाला? या प्रश्नावर ते म्हणाले, ''मी भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीला पाठिंबा दिला आहे. ही निवडणूक अजून लांब आहे. आघाडीने पी. ए. संगमा यांना पाठिंबा दिला आहे. पण मी कोणाला मत द्यायचे हे अजून ठरवलेले नाही. ही निवडणूक बिनविरोध झाली तर मत देण्याचा प्रश्नच येणार नाही; पण या रिंगणात माजी राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम असते तर माझे मत मी नक्कीच त्यांना दिले असते.''

# कोवाड परिसरातील खराब रस्त्यांसाठी लढा

## राजेंद्र गड्ड्यान्नावर : दयनीय अवस्था; ग्रामस्थांत असंतोष

कोवाड : परिसरातील रस्त्यांचा प्रश्न गंभीर आहे. येथील ग्रामस्थ वर्षानुवर्षे खड्ड्यांतूनच प्रवास करतात. रस्त्यांवर डांबर पडून वाहतूक कधी सुरळीत होणार, याची लोकांना प्रतीक्षा आहे. पावसाळ्यात पाण्याने तुडूंब भरलेल्या रस्त्यावरून प्रवास करावा लागतो आहे. त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असल्याने या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी जनआंदोलन उभारणार असल्याचा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे गडहिंग्लज विभागाचे प्रमुख राजेंद्र गड्ड्यान्नावर यांनी पत्रकार परिषदेत दिला.

कोवाड-बेळगाव रस्त्यावर खोदलेल्या चरींमुळे एकाच दिवशी पंधरा अपघात झाले. या संदर्भात माहिती घेण्यासाठी श्री. गड्ड्यान्नावर कोवाड दौऱ्यावर आले होते. त्यावेळी त्यांनी कोवाड-कामेवाडी, कुदनूर-राजगोळी, कागणी-कुदनूर, कुदनूर-किटवाड, कोवाड-ढोलगरवाडी फाटा, होसूर-बुक्किहाळ, राजगोळी-तिरमाळ या रस्त्यांची पाहणी करून पत्रकार परिषद घेतली.

श्री. गड्ड्यान्नावर म्हणाले, ''देशाला स्वातंत्र्य मिळून ६५ वर्षे झाली, तरी अद्याप मुलभूत प्रश्न सुटलेले नाहीत. कोवाड-कामेवाडी हा रस्ता दोन वर्षापूर्वी पंतप्रधान सडक योजनेतून पूर्ण झाला आहे. दोन वर्षात या रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. कुदनूर-राजगोळी हा रस्ता खड्ड्यांनी व्यापला आहे. कुदनूर-किटवाड या रस्त्याची अवस्था दयनीय झाली आहे.

कोवाड-बेळगाव रस्त्याचे रुंदीकरण व मजबुतीकरण रखडले आहे. रस्त्याच्या अशा अवस्थेमुळे प्रवाशांतून संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. तीन वर्षापूर्वी राजगोळी ते ढोलगरवाडी फाटा या रस्त्यासाठी लोकांनी उपोषण केले; पण शासनाने याबाबत दखल घेतलेली नाही.



गडहिंग्लज : प्रांत कार्यालयात झालेल्या संयुक्त बैठकीत ॲड. श्रीपतराव शिंदे व राजेंद्र गड्ड्यान्नावर यांच्यात जोरदार वादावादी झाली.

# ऊस बिलावरून शिंदे-गड्ड्यान्नावर यांच्यात जुंपली

## गडहिंग्लजला 'स्वाभिमानी'चा मोर्चा

गडहिंग्लज : गडहिंग्लज साखर कारखान्याकडील थकीत ऊस बिलासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने नुकताच प्रांत कार्यालयावर मोर्चा काढला. यावेळी आंदोलक व कारखाना संचालकांचे समर्थक आमने-सामने आल्याने तणाव निर्माण झाला. प्रांताधिकारी नीलिमा धायगुडे यांच्या अध्यक्षतेखालील संयुक्त बैठकीत कारखान्याचे अध्यक्ष ॲड. श्रीपतराव शिंदे व 'स्वाभिमानी'चे विभागप्रमुख राजेंद्र गड्ड्यान्नावर यांच्यात कारखान्याचा कारभार व मोर्चाच्या पद्धतीवरून जोरदार वादावादी झाली. ॲड. शिंदे यांनी १५ दिवसांत थकीत रक्कम देण्याचे आश्वासन दिले. मोठ्या पोलिस बंदोबस्तामुळे दसरा चौकाला पोलिस छावणीचे स्वरूप आले.

कारखान्याकडे १ जानेवारी २०१२ नंतर गाळपास आलेल्या उसाची थकीत रक्कम मिळावी, यासाठी 'स्वाभिमानी'ने प्रांत कार्यालयावर धडक दिली. दुपारी दीडला शिवाजी चौकातून सुरू झालेला मोर्चा मुख्य मार्गावरून प्रांत कार्यालयावर आला. आंदोलकांच्या घोषणांनी परिसर दणाणला होता. दुपारी बारापासूनच कारखाना संचालकांचे समर्थक व काम गार पालिकेच्या आवारात जमले होते. अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांनी खबरदारी घेतली होती. पालिकेच्या फ ाटकासह सभोवताली पोलिसांनी कडे केले.

श्री. गड्ड्यान्नावर म्हणाले, ''लोकशाही पद्धतीने आमचे आंदोलन सुरू आहे. हुल्लडबाजी करण्यासाठी आलो नाही. ३० एप्रिलपर्यंत पैसे देण्याचे आश्वासन तीन महिन्यांनंतरही पाळलेले नसल्याने पुन्हा मोर्चा काढावा लागला. फ ौजदारी दाखल झाली म्हणजे बिले दिली असा अर्थ होत नाही.''

यानंतर प्रांत कार्यालयात संयुक्त बैठक झाली. श्री. गड्ड्यान्नावर यांनी उपस्थित केलेल्या कामगार पगाराच्या मुद्यावरून वादाची ठिणगी पडली. कामगार संघटनेचे विजयसिंह देसाई, रमेश मगदूम यांनी पगारासंदर्भात कामगारांची कोणतीही तक्रार नसल्याने त्यासंबंधी बोलू नये, असे बजावले. संचालक संभाजी नाईक यांनी गड्ड्यान्नावर कारखान्याचे सभासद नसल्याने त्यांना बिलासंदर्भात बोलण्याचा अधिकार नसल्याचा आक्षेप घेतला. यावर माझे वडील संस्थापक

पान ९ वर ▶

# शिंदे-गड्ड्यान्नावर यांच्यात ऊस बिलावरून जुंपली

▶ पान ८ वरुन

सभासद आहेत. त्यामुळे वारसदार म्हणून मला बोलण्याचा अधिकार असल्याचे श्री. गड्ड्यान्नावर यांनी प्रत्युत्तर दिले. सौ. धायगुडे यांनी मध्यस्थी करीत हा वाद थांबविला.

श्री. शिंदे म्हणाले, ''राज्य बँकेने थकहमीअभावी कर्ज नाकारल्याने बिले देण्यास विलंब झाला. अन्य १२ कारखान्यांचीही अशीच अवस्था आहे. कारखान्याने आतापर्यंत २७ कोटी ४६ लाख रुपये दिले आहेत. 'एफ आरपी'नुसार सहा कोटी, तर जाहीर केलेल्या २०५२ दराप्रमाणे १९ कोटी ८४ लाख रुपये देणे आहेत. मंगळवारी सेवा संस्थांची जमा केलेली दहा कोटी ५५ लाखांची रक्कम दोन दिवसांत त्यांच्या खात्यावर वर्ग होईल.''

यानंतर श्री. गड्ड्यान्नावर यांनी लेखापरीक्षणात नोंदविलेल्या आक्षेपांचा संदर्भ देत चुकीच्या कारभारामुळे कारखाना उणे नेटवर्थमध्ये गेल्याचा आरोप केला. श्री. शिंदे यांनी या आरोपाला आक्षेप घेत दहा वर्षांत 'एफ आरपी'पेक्षा १०० कोटी जादा दिल्याने तोटा झाल्याचे सांगितले. या वेळी वैयक्तिक आरोप-प्रत्यारोपांमुळे पुन्हा जोरदार वादावादी झाली. सौ. धायगुडे यांनी हे प्रशासकीय कार्यालय आहे. कारखान्याची जनरल सभा नसल्याचे बजावले. दोन्ही बाजूकडून कायदा व सुव्यवस्था बिघडेल, असे कोणतेही वर्तन न करण्याची ताकीद त्यांनी दिली. संचालकांतर्फे स्वाती कोरी, बाळासाहेब मोरे, तर आंदोलकांतर्फे सुभाष पाटील, दिलीप बेळगुद्री, अप्पासाहेब चौडाज, तानाजी देसाई उपस्थित होते. पोलिस उपअधीक्षक अशोक भरते यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक अनिल कदम, उपनिरीक्षक बाजीराव सूर्यवंशी, अंकुश पवार यांनी बंदोबस्त ठेवला.

## आम्ही जात्यात, तुम्ही सुपात...

प्रांत कार्यालयासमोर एक बाजूला आंदोलक, तर दुसऱ्या बाजूला समर्थक व कामगार अशी अवस्था होती. कामगारांना उद्देशून श्री. गड्ड्यान्नावर यांनी 'आम्ही आज जात्यात आहोत, तर तुम्ही सुपात आहात,' असे सांगितले; परंतु बैठकीत कामगार संघटनेच्या प्रतिनिधींनी कामगार वर्षभर बिनपगारी राबण्यास तयार असल्याचे सांगितले.

## याच भाषेत उत्तर मिळेल...

प्रांत कार्यालयातील संयुक्त बैठक संपल्यानंतर दोन्ही बाजूचे प्रतिनिधी बाहेर येत होते. त्यांना पाहून आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी सुरू केली. त्यामुळे संतापलेल्या सौ. कोरी यांनी श्री. गड्ड्यान्नावर यांना 'यापुढे तुम्हालाही याच भाषेत उत्तर मिळेल' असा दम भरला. यावर श्री. गड्ड्यान्नावर यांनी बोलण्याचे टाळले.

# शिरोळ, हातकणंगले तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्टतर्फे ५ लाखांची औषधे

जयसिंगपूर : शिरोळ आणि हातकणंगले तालुक्यात काविळीची साथ नियंत्रणात आणण्यासाठी महाराष्ट्र राज्य औषध विक्रेता संघटनेने दोन्ही तालुक्यांतील शासकीय रुग्णालयांना पाच लाख रुपयांची औषधे देण्याचा निर्णय घेतला आहे. शिरोळ येथे अन्न व औषध प्रशासन मंत्री व गृहराज्यमंत्री सतेज पाटील यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीवेळी याबाबतची घोषणा करण्यात आली. दि महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन मुंबईचे पश्चिम विभागाचे अध्यक्ष मदन पाटील यांच्या संघटनेनेही मदतीचा हात पुढे केला आहे. शिरोळ आणि हातकणंगले तालुक्यांतील तहसील कार्यालयामार्फत या औषधांचा पुरवठा केला जाणार आहे. बैठकीस खासदार राजू शेट्टी, आमदार डॉ. सा. रे. पाटील, तहसीलदार डॉ. संपत खिलारी, संघटनेचे शिरोळ तालुका संचालक सुनील हाळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# लेखापरीक्षण अहवालानुसारच 'भोगावती'च्या चौकशीचे आदेश

## डॉ. जालंदर पाटील : दुहेरी भत्ते उचललेल्या संचालकांची पैसे भरण्यास सुरवात

राशिवडे बुद्रुक : लेखापरीक्षण अहवालानुसार भोगावती साखर कारखान्यातील घोटाळ्याची व संचालकांची सखोल चौकशी करण्याचे आदेश साखर सहसंचालकांनी प्रादेशिक सहसंचालकांना दिले आहेत. खासदार राजू शेट्टी यांनी साखर आयुक्तांकडे याबाबत मागणी केली होती. शिवाय दुहेरी भत्ते उचललेल्या आजी-माजी संचालकांनी पैसे भरण्यास सुरवात केली आहे, अशी माहिती स्वाभिमानी पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ. जालंदर पाटील व भोगावती परिसर अध्यक्ष जनार्दन पाटील यांनी दिली.

कारखान्याच्या कारभारावर ताशेरे ओढत लेखापरीक्षकांनी मोठ्या प्रमाणात चुकीचा कारभार झाल्याचे उघड केले. त्यांनी दिलेल्या दोनशे पानी अहवालामध्ये खरेदी- विक्री, मोलॅसिस विक्री, लॅगिंगमध्ये मोठा घोळ दिसून आल्याचे म्हटले आहे. याची एक प्रत खासदार शेट्टी यांनी दिल्यानंतर त्यांनी याच्या आधारावर साखर आयुक्तांकडे सखोल चौकशी करून अहवालाची मागणी केली होती. याची दखल घेऊन नुकतीच चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याचे आदेश सहसंचालक वाय. पी. गिरी यांनी कोल्हापूरचे प्रादेशिक सहसंचालक डी. आर. घोडे यांनी दिले आहेत.

याबाबत डॉ. पाटील म्हणाले, ''कारखान्याचे अध्यक्ष धैर्यशील पाटील आपण हा अहवाल दिला असल्याचे म्हणत आहेत. ते चुकीचे असून आम्ही तो उपलब्ध केला आहे. आम्ही दिशाभूल करीत नसून तुम्ही आणि तुमचे संचालक मंडळच दिशाभूल करीत आहे. हे आता चौकशी आदेशावरून स्पष्ट झाले आहे. शिवाय कारखाना चांगला चालवला म्हणता मग वर्षभराची सभासदांची साखर कुठे आहे. आम्ही हा अहवाल आमच्या भोगावती येथील कार्यालयात सभासदांसाठी ठेवला आहे. असा चौकशीचा आदेश हा जिल्ह्यातील पहिला प्रकार असावा. असे अहवाल सभासदांनी आजवर मागून अभ्यासले असते तर कारखानदारीतील भ्रष्टाचार रोखता आला असता. आता प्रतिवर्षी लेखापरीक्षकांचा अहवाल राज्यातील सर्वच साखर कारखान्यांनी सभासदांसाठी खुला ठेवावा, अशी मागणी करीत आहोत.

जनार्दन पाटील म्हणाले, ''कारखान्याची डिस्टिलरी चालवण्यास दिली; पण त्याचा केलेला करार गुलदस्त्यातच आहे आणि मोलॅसिसचे टँक बुजवण्यासाठी बगॅस वापरण्यात येत आहे, हा कुठला बचतीचा प्रकार. आजवर प्रवास आणि मीटिंग भत्ते उचलणाऱ्या संचालकांनी पैसे भरण्याचे काम सुरू केले आहे. यात किमान वीस लाख रुपये वसूल होतील. जे भरणार नाहीत त्यांच्यावर न्यायालयीन खटले भरून त्यांच्या नावाची यादी गेटवर लावू.''

यावेळी संघटनेचे भीमराव गोनुगडे, अण्णापा पाटील, पोपट जमादार, संजय मगदूम, विलास पाटील, बाबूराव पाटील, सागर पाटील, शंकर हुजरे, संग्राम चौगले, पांडुरंग साळोखे, सुरेश पाटील, मारुती पाटील आदी उपस्थित होते.

# कोवाड परिसरातील खराब रस्त्यांसाठी लढा

## राजेंद्र गड्ड्यान्नावर : दयनीय अवस्था; ग्रामस्थांत असंतोष

कोवाड : परिसरातील रस्त्यांचा प्रश्न गंभीर आहे. येथील ग्रामस्थ वर्षानुवर्षे खड्ड्यांतूनच प्रवास करतात. रस्त्यांवर डांबर पडून वाहतूक कधी सुरळीत होणार, याची लोकांना प्रतीक्षा आहे. पावसाळ्यात पाण्याने तुडुंब भरलेल्या रस्त्यावरून प्रवास करावा लागतो आहे. त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असल्याने या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी जनआंदोलन उभारणार असल्याचा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे गडहिंग्लज विभागाचे प्रमुख राजेंद्र गड्ड्यान्नावर यांनी पत्रकार परिषदेत दिला.

कोवाड-बेळगाव रस्त्यावर खोदलेल्या चरींमुळे एकाच दिवशी पंधरा अपघात झाले. या संदर्भात माहिती घेण्यासाठी श्री. गड्ड्यान्नावर कोवाड दौऱ्यावर आले होते. त्यावेळी त्यांनी कोवाड-कामेवाडी, कुदनूर-राजगोळी, कागणी-कुदनूर, कुदनूर-किटवाड, कोवाड-ढोलगरवाडी फाटा, होसूर-बुक्किहाळ, राजगोळी-तिरमाळ या रस्त्यांची पाहणी करून पत्रकार परिषद घेतली.

श्री. गड्ड्यान्नावर म्हणाले, ''देशाला स्वातंत्र्य मिळून ६५ वर्षे झाली, तरी अद्याप मुलभूत प्रश्न सुटलेले नाहीत. कोवाड-कामेवाडी हा रस्ता दोन वर्षापूर्वी पंतप्रधान सडक योजनेतून पूर्ण झाला आहे. दोन वर्षांत या रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. कुदनूर-राजगोळी हा रस्ता खड्ड्यांनी व्यापला आहे. कुदनूर-किटवाड या रस्त्याची अवस्था दयनीय झाली आहे.

कोवाड-बेळगाव रस्त्याचे रुंदीकरण व मजबुतीकरण रखडले आहे. रस्त्याच्या अशा अवस्थेमुळे प्रवाशांतून संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. तीन वर्षापूर्वी राजगोळी ते ढोलगरवाडी फाटा या रस्त्यासाठी लोकांनी उपोषण केले; पण शासनाने याबाबत दखल घेतलेली नाही.

---

# दुय्यम निबंधक कार्यालयाची जागा बदलण्याची 'स्वाभिमानी'ची मागणी

गडहिंग्लज : येथील दुय्यम निबंधक कार्यालयाची जागा गैरसोयीची आहे. त्यामुळे कार्यालय सोयीच्या ठिकाणी हलवावे, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने निवेदनातून केली आहे.

येथील चर्च रोडवर दुय्यम निबंधकांचे कार्यालय आहे. तेथे मृत्यूपत्र, खरेदी-विक्री, हक्कसोडपत्र, बोजा नोंद यासारख्या कामांसाठी नागरिकांची वर्दळ असते. तिसऱ्या मजल्यावर कार्यालय असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. विशेषतः आजारी व शारीरिकदृष्ट्या कमकुवत असलेल्यांना अधिक त्रास होत आहे. त्यामुळे सोयीच्या ठिकाणी कार्यालय हलवावे, अशी मागणी निवेदनात केली आहे. निवेदनावर विभागप्रमुख राजेंद्र गड्ड्यान्नावर, अप्पासाहेब देसाई, नानासाहेब देसाई, बाबासाहेब माने, हणमंत तेगिनाळे, दुरदुंडी देसाई, सदाशिव कानडे, कृष्णा शिंदे, सूरज कानडे, बसवाणी मलकान्नावर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



रुकडी : येथील गावचावडीसमोर घरकुल योजनेतील गरजू लाभार्थ्यांना डावलल्याच्या निषेधार्थ केलेल्या ठिय्या आंदोलनात सामाजिक संघटना व ग्रामस्थ सहभागी झाले.

# रुकडीत घरकुल योजनेतील लाभार्थींचे गावचावडीत ठिय्या आंदोलन

रुकडी : येथील ग्रामपंचायतीने गरजू लाभार्थ्यांना गेल्या ११ वर्षांपासून इंदिरा आवास घरकुल योजनेअंतर्गत निवड, तसेच प्रतीक्षा यादीपासून वंचित ठेवल्याबाबत स्वाभिमानी शेतमजूर संघटना व शाहू-फु ले-आंबेडकर युवा मंचने चावडी चौकात एक दिवसाचे ठिय्या आंदोलन केले. घरकुल लाभार्थींची रक्कम खात्यावर जमा करणे व रमाई योजनेअंतर्गत लाभ देण्याचे सरपंच, ग्रामविकास अधिकाऱ्यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

घर असणाऱ्या लोकांचा यादीत समावेश कसा झाला, घरकुल मंजूर अनुदान का मिळाले नाही, असा सवाल आंदोलनकर्त्यांनी करत ग्रामपंचायत पदाधिकाऱ्याला धारेवर धरले. मागासवर्गीय घरकुल योजना, इंदिरा गांधी, संजय गांधी, श्रावणबाळ या योजनांच्या लाभार्थींसह प्रतीक्षा यादीची रितसर चौकशी करण्याबाबतचे निवेदन तहसीलदार, गटविकास अधिकारी, हातकणंगले पोलिस ठाणे यांना देण्यात आले. ग्रामपंचायतीच्या वतीने मागासवर्गीय प्रतीक्षा यादीमध्ये ज्यांची नावे नाहीत, त्यांना रमाई योजनेअंतर्गत मागासवर्गीय घरकुल योजनेत लाभ देण्याचा, तसेच २००८-०९ च्या घरकुल लाभार्थींच्या खात्यावर रक्कम वर्ग करण्याचे आश्वासन ग्रामविकास अधिकारी, सरपंच, उपसरपंचांनी दिले. आंदोलनात किरण चव्हाण, अकूबाई कांबळे, शरद कांबळे, संजय कांबळे, अशोक कांबळे, संतोष कांबळे, मायाप्पा कांबळे, इंदूबाई धनवडे, अरुण गोंदणे, पंकज नाम ॆ, नंदकुमार नाईक, विजय चोकाककर, जगन्नाथ कांबळे, सुदाम भोसले, गौतम चव्हाण यांच्यासह स्वाभिमानी शेतमजूर संघटना, शाहू-फु ले-आंबेडकर युवा मंचचे कार्यकर्ते, ग्रामस्थ व महिला सहभागी झाल्या होत्या.

# शेतकऱ्यांच्या मुलांनी लिहिते व्हावे

## राजू शेट्टी : ‘पायपीट बळिराजाची...’ पुस्तकाचे प्रकाशन




कोल्हापूर : ‘‘संघर्ष करणाऱ्या कार्यकर्त्यांचे चित्रण साहित्यात उतरले तरच चळवळी भक्कम होतात, मात्र ज्यांच्या हाती लेखणी आहे, अशा घटकांची लेखणी शोषितांच्या प्रश्नावर लेखन करताना बोथट होते. साहित्याच्या क्षेत्रातही राजकारण मोठे आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लेखन करण्यासाठी शेतकऱ्यांच्या मुलांनी पुढे यावे,’’ असे प्रतिपादन खासदार राजू शेट्टी यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचा विद्यार्थी सूरज रसाळ याने लिहिलेल्या ‘पायपीट बळिराजाची... पाण्याच्या थेंबासाठी’ या पुस्तकाचे प्रकाशन मराठी विभागाचे प्रमुख डॉ. रवींद्र ठाकूर यांच्या हस्ते झाले. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटने नेते राजू शेट्टी यांनी पुस्तकनिर्मितीसाठी सहकार्य केले. यावेळी ते बोलत होते.

स्वाभिमानीचे नेते खासदार श्री. शेट्टी यांनी गतवर्षी ‘चांदोली ते कोल्हापूर’ शेतीच्या पाण्यासाठी पायी संघर्ष यात्रा काढली. या संघर्ष यात्रेतही तरुण लेखक श्री. रसाळे सहभागी झाला. शेकडो कार्यकर्ते यात्रेत होते. भविष्यात पाण्याची भीषण समस्या निर्माण होणार आहे. याचा फटका शेतकऱ्याला बसणार आहे. पर्यायाने शेतीला बसणार आहे. धरणे बांधली. पाणी योजना आणल्या. पण, शेतीला पुरेसे पाणी मिळत नाही. पाणी विकत घ्यायची वेळ आली आहे, तर शहरीकरणात पाणी प्रदूषित होत आहे. या साऱ्यात देशभरात पाण्याचा अपव्यय सुरू झाला आहे. या साऱ्याचे संदर्भ या संघर्ष यात्रेच्या निमित्ताने या पुस्तकात श्री. रसाळ याने रेखाटले आहे.

श्री. रसाळ म्हणाले, ‘‘राज्यातील धरणे बांधण्यासाठी हजारो शेतकऱ्यांच्या जमिनी खर्ची पडल्या आहेत; मात्र त्या धरणाच्या पाण्याचा वापर योग्य रीतीने होत नाही. परिणामी शेतीसाठी पुरेसे पाणी मिळत नाही हा प्रश्न ज्वलंत वाटला. त्यामुळे श्री. शेट्टी यांच्या संघर्ष यात्रेत सहभागी झालो. या यात्रेतील चित्रणाबरोबरच एखाद्या चळवळीला लोकांचे पाठबळ लाभले तर त्या चळवळीला बळकटी कशी येते याचा अनुभवही लेखन करताना घेता आले.’’

रवींद्र ठाकूर म्हणाले, ‘‘अलीकडच्या काळात पोट भरलेल्या वर्गाचे साहित्य येत आहे. यात वंचितांच्या प्रश्नांना कोठेही स्पर्श झालेला नसतो. त्यामुळे असे साहित्य सामाजिक प्रश्नांना भिडत नाही. पण ज्याने सम स्यांचं जगणं अनुभवलं त्यांनी ते लिहिण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.’’ यावेळी सदाभाऊ खोत, जिल्हाध्यक्ष डॉ. जालंदर पाटील, भगवान काटे, स्वाभिमानी विचार पाक्षिकाचे संपादक महावीर अक्कोळे, लोकमतचे संपादक वसंत भोसले व मराठी विभागाचे विद्यार्थी, शेतकरी उपस्थित होते.

# यंदा पहिली उचल किमान २७९३ रुपये द्या

## खासदार राजू शेट्टी : कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष डॉ. गुलाटी यांच्याशी चर्चा

जयसिंगपूर : यंदाच्या हंगामात उत्पादन खर्चाप्रमाणे उसाला प्रतिटन पहिल्या ९.६ टक्के उताऱ्याला २७९३ रुपये, तर ११.३० टक्के उताऱ्याला ३३२२ रुपये दर मिळावा, अशी मागणी खासदार राजू शेट्टी यांनी कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष डॉ. अशोक गुलाटी यांच्याकडे केली. येत्या गळीत हंगामातील ऊसदराच्या पार्श्वभूमीवर खासदार शेट्टी यांनी श्री. गुलाटी यांची दिल्लीत भेट घेतली.

राज्य सरकारने कृषिमूल्य आयोगाला पाठविलेला उसाचा उत्पादन खर्च पूर्णपणे चुकीचा असल्याचे सांगून उत्पादन खर्चाबाबत खासदार शेट्टी म्हणाले, ''सध्या ऊस लावताना शेतकऱ्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. मजुरी, बियाणे, खते, पाणी, वीज आदींचे दर वाढले आहेत. शेतकऱ्यांना एफआरपीची रचनाच मान्य नाही. उत्पादन खर्चावर आधारित दर दिला पाहिजे. मजुरीचे दर दिवसाकाठी दीडशे ते दोनशे रुपये द्यावे लागतात. खताच्या दरात दुप्पट-तिप्पट वाढ झाली आहे. ऊस पिकविताना हेक्टरी दोन लाख ७८ हजार रुपये खर्च येत असताना राज्य सरकारची आकडेवारी मात्र शेतकऱ्यांच्या पोटावर मारणारी आहे. राज्य सरकारने केलेली शिफारस चुकीची आहे. त्यामध्ये त्यांनी मजुरीसाठी ५७ रुपये दर पकडलेला आहे. प्रत्यक्षात इतक्या कमी मजुरीत काम करण्यास मजूर तयार नाहीत. त्यामुळे राज्य व केंद्र सरकार शेतकऱ्यांची फसवणूक करत असल्याचे स्पष्ट होते.''

पहिल्या ९.५ टक्के उताऱ्याला २७९३ रुपये दर दिला पाहिजे. त्यापुढील प्रत्येक टक्क्यांकरिता २८५.६८ रुपये दर मिळाला पाहिजे, अशी मागणी करून उत्पादन खर्च आयोगाच्या अध्यक्षांना देऊन शासनाने शिफारस केलेला खर्च चुकीचा असल्याचे निदर्शनास आणले. महाराष्ट्रात यंदा उसाच्या क्षेत्रात वाढ झाली आहे, तसेच दुष्काळामुळे उसाची म्हणावी तशी वाढ झाली नाही. याचाही विचार व्हावा, असे सांगितले.

केंद्र सरकार उसाच्या दराबाबत शेतकऱ्यांची फसवणूक करीत आहे. वास्तविक, उत्पादन खर्चानुसार शेतकऱ्यांना दर मिळावा, अशी मागणी असताना कमी उत्पादन खर्च दाखवून शासन शेतकऱ्यांची फसवणूक करीत असल्याचे निवेदनही खासदार शेट्टी यांनी श्री. गुलाटी यांना दिले.



## पावसाअभावी पन्नास टक्के

# पेरण्या खोळंबल्या

कोल्हापूर, ता. १ : पावसाअभावी गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पेरण्यांचे प्रमाण ५० ते ७० टक्क्याने घटले आहे. पावसाने दीर्घ काळ ओढ दिल्यामुळे परिस्थिती चिंताजनक झाली आहे.

जिल्ह्यात यावर्षी ३ लाख ९० हजार हेक्टरमध्ये खरिपाच्या पेरण्यांचे नियोजन आहे. जून महिन्याअखेर यापैकी ७० टक्के पेरण्या पूर्ण होतील, अशी अपेक्षा होती. मात्र पावसाने दगा दिल्याने आतापर्यंत सुमारे ३५ टक्केच पेरण्या झाल्या आहेत. बेभरवशाच्या पावसामुळे उर्वरित पेरण्या खोळंबल्या आहेत. पावसाअभावी उगवणीच्या वाटेवर असलेले भात, सोयाबीन, भुईमूगही करपून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मोठ्या पावसामुळे पिकांना गती मिळते. शेतकऱ्यांनी उसाला खतांचा डोस दिला आहे. पण अपेक्षित पाऊस नसल्यामुळे उसाच्या उत्पादनात घट होणार आहे.

गेल्यावर्षी भात, भुईमूग व सोयाबीनच्या पेरण्या वेळेत झाल्या होत्या. जून २०११ अखेर सुमारे ७० टक्के पेरण्या पूर्ण झाल्या होत्या. जुलैमध्ये १०० टक्के पूर्ण झाल्या होत्या. यंदा मात्र याच्या उलटे चित्र आहे. माळरानातील भुईमूग किंवा सोयाबीन पिकाला पाणी मिळत नाही. त्यामुळे अशा ठिकाणी दुबार पेरणीचे संकट अजूनही टळलेले नाही. पावसाच्या लहरीपणामुळे बळिराजा चिंतातूर झाला आहे.

आज-उद्या म्हणत तब्बल महिन्यानंतरही पावसाने आपला जम बसविला नसल्याने शेतकऱ्यांना पेरलेल्या पिकासाठी किंवा उसासाठी पाणी देण्यासाठी नव्याने वीजपंपांचा आधार घ्यावा लागत आहे.

कुठे मुसळधार, तर कुठे कोरडेपणा

चंदगड : निसर्गाचा लहरीपणा जाणून घ्यायचा असेल तर चंदगड तालुक्याच्या पश्चिम भागाचा दौरा अभ्यासपूर्ण ठरेल. पाण्याच्या आधाराने शेती करणारा आणि दुसरीकडे पाणी नाही म्हणून आभाळाकडे आस लावून बसलेला,



मुबलक पावसाच्या पाण्यामुळे चेहऱ्यावर आनंद तर दुसरीकडे पाऊस नाही म्हणून चिंताग्रस्त असे दोन्ही प्रकारचे शेतकरी तुमच्या नजरेत येतील. कोकणातील मुसळधार पाऊस आणि देशातील कोरडेपणा चंदगडमध्ये अवघ्या दहा किलोमीटरच्या परिसरात पाहायला मिळत आहे.

अतिपावसाचा तालुका म्हणून ओळख असलेल्या चंदगड तालुक्यात यावर्षी पावसाने दगा दिला आहे. मात्र अन्य तालुक्यापेक्षा काहीसे वेगळे वातावरण इथे पाहायला मिळत आहे. कोकण किनारपट्टीला लागून असलेल्या जांबरे, उमगाव, न्हावेली, कोकरे, अडुरे परिसरात दररोज पावसाची हजेरी लागते. मे महिन्यातील वळीव आणि त्यानंतर मॉन्सूननेही या भागाला आधार दिला आहे. ओढे नाले भरून वाहत

पान १६ वर ▶

# पावसाअभावी पन्नास टक्के पेरण्या खोळंबल्या

▶ पान १५ वरुन

असून भाताच्या रोप लावणीलाही मुबलक पाणी आहे. दरवर्षीपेक्षा प्रमाण कमी असले तरी शेतीसाठी आवश्यक पाण्याची उपलब्धता असल्याने शेतकरी आनंदित आहेत. तेथून अवघ्या काही अंतरावर चंदगड, नागनवाडी, दाटे, अडकूर, आमरोळी परिसरात म्हणावा तसा पाऊस नसल्याने रोप लावणीसह नाचणा, मिरची, रताळी लागवड खोळंबली आहे.

या भागातील शेतकरी पावसाकडे डोळे लावून बसला आहे. भाताच्या तरव्यांची उत्तम उगवण झाली असताना पाणी नाही म्हणून बसून राहण्याची वेळ आली आहे. पाण्याच्या आधाराने शेतात कष्ट ओतणारा आणि त्याच पाण्याअभावी बसून राहिलेला शेतकरी असे चित्र प्रथमच तालुक्यात निर्माण झाले आहे. अतिपावसाचा कोकण आणि कमी पावसाचा देशी भाग अशा प्रकारचे वातावरण अनुभवायला मिळत आहे.

अक्कोळ : चालू वर्षी वळीव पावसासह पावसाळ्यातील आतापर्यंत झालेल्या सर्वच नक्षत्रांनी दडी मारल्याने चिक्कोडी तालुक्यातील प्रामुख्याने शेती व्यवसायावर विसंबून असणारी जनता अक्षरश: भांबावून गेली आहे.

प्रतिवर्षी तंबाखू लावणीपूर्वी हरित खत म्हणून जूनच्या पहिल्या सप्ताहात होणारा ताग, उडीद, डैंच्या आदींचा पेरणी हंगाम यावर्षी पूर्णपणे वाया गेल्याने तालुक्यातील तंबाखूसाठी राखून ठेवलेल्या जमिनी कोरड्याच दिसून येत आहेत.

पावसाच्या ओढीमुळे अद्याप म्हणावी त्याप्रमाणात मशागतींची कामेही झाली नसल्याने अनेक ठिकाणी केवळ ट्रॅक्टर नांगरटीशिवाय इतर कामे खोळंबून आहेत. प्रतिवर्षीच्या तुलनेत पावसाच्या दिरंगाईने शेतजमिनीत तण तणकटाची उगवण झाली नसल्याने मजुरानांही कामाअभावी दिवस काढावा लागत आहे. मजूर वर्गाप्रमाणेच जनावरधारकांना प्रतिवर्षाप्रमाणे बैलाच्या माध्यमातून होणाऱ्या मशागतींची कामे कमी प्रमाणात असल्याने त्यांच्यापुढे आपद्ग्रस्त काळात जनावरांचे संगोपन कसे करायचे, हा प्रश्न उभा आहे.

प्रामुख्याने तंबाखू पिकावर विसंबून असणाऱ्या अक्कोळ व परिसरात शेतकरी स्वत: वाफे तयार करून रोपांची निमिती करतो. स्वत: वाढविलेल्या रोपांचीच लावण करणे पसंत करतो. त्याला अनुसरून सध्या तंबाखू वाफे तयार करून त्यावर बियाणे टाकणे यासारख्या कामांची धांदल सर्वत्र दिसून येत आहे. पावसाअभावी जमिनीत म्हणावा तसा ओलावा नसल्याने वाळलेल्या मातीचेच वाफे बहुतांश शेतकऱ्यांनी तयार केले असून पाणी उपलब्ध असणाऱ्या शेतकऱ्यांनी कोरड्या जमिनीला पाणी देऊन वाफे केले आहेत. सध्या अनेक समस्या व त्रासाला सामोरे जाऊन वाफे तयार करून बियाणे टाकले असले तरी वाफ्यांना रोज सकाळ, सायंकाळ पाणी कोठून आणून घालायचे, हा सुद्धा गंभीर प्रश्न शेतकऱ्यापुढे उभा आहे. विहिरींच्या पाणी पातळीतही कमालीची घट झाल्याने खोलवर उतरून पाणी आणून वाफ्यांना घालणे म्हणजे एक प्रकारची कसरतच आहे.



जनावरांना अद्याप ओल्या गवताचा चारा मिळणे कठीण झाले असून वाळलेला कडबा, उसाचा पाला यावर जनावरांचे संगोपन करण्याची वेळ आली आहे. एकंदरीत सध्या असणाऱ्या ऊस पिकाची वाढ होण्यासाठी दमदार व मोठ्या पावसाची गरज आहे. जर पावसाने अशीच ओढ दिली तर चालू वर्षी ऊस पिकाचीही म्हणावी तशी वाढ न होता ऊस पिकावरही संकट येणार काय, अशी परिस्थिती दिसून येत आहे.

# महाराष्ट्रावर दुष्काळाची छाया





नेज स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून

## ३० हजार रुपयांची देणगी

नेज (प्रतिनिधी) : नेज (ता. हातकणंगले) येथील स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून ३० हजार रुपयांचा कृतज्ञता निधी देण्यात आली. सदर निधी खासदार राजू शेट्टी यांच्याकडे सुपूर्त करण्यात आली. गावातील सर्वच शेतकरी, व्यापारी तसेच ग्रामस्थांकडून स्वाभिमानी शेतकरी संघटनेसाठी भरघोस निधी देण्यात आला. यावेळी झालेल्या कार्यक्रमात खा. राजू शेट्टी म्हणाले, ''स्वाभिमानी शेतकरी संघटना ही तळागाळातील कार्यकर्त्यांची संघटना असून सर्वसामान्यांच्या मदतीवरच संघटनेची वाटचाल सुरू आहे. नेज संघटनेकडून देण्यात आलेल्या निधीबद्दल मी त्यांचा आभारी असून येथून पुढेही वेळोवेळी सहकार्य राहील अशी अपेक्षा व्यक्त करतो.''

यावेळी सर्व पदाधिकारी, ग्रामस्था, विविध संस्थांचे पदाधिकारी संघटनेचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

# महाराष्ट्रावर दुष्काळाची छाया







